प्रकरण सहावे : १०१

उपसंहार

संदर्भ सूची १०८

लेखक परिचय ११२

# प्रस्तावना

आज एकविसाव्या शतकात संगणक माहिती आणि तंत्रज्ञान आणि विविध प्रसारमाध्यमे यामुळे संपूर्ण जग एक खेडे बनले आहे. ज्ञानेश्वरांची विश्वात्मता खऱ्या अर्थाने आज आपण अनुभवतोय. याच अनुभवातून प्रस्तुत कथासंग्रह साकार झाला आहे.

व्यवसाय, शिक्षण या निमित्ताने भारतीय लोक परदेशात स्थायिक झाले आहेत. परदेशातही ते आपल्या चालीरिती, रूढी, परंपरा टिकवून एकत्र गुण्यागोविंदाने राहत आहेत. तेथील संस्कृतीशी त्यांचा संबंध आला तरी त्यांनी आपली मूळ संस्कृती मनानी जोपासली आहे. काही लोक काही निमित्ताने आपले कुंपन ओलांडून पलीकडे गेले आहेत तरी त्यांच्या मनात अलीकडील जगाविषयी खूप आत्मीयता, आपुलकी आहे हे त्यांच्या अनुभवावरून दिसून येते.

दिलीप वि. चित्रे आपल्या "कुंपनापलीकडले शेत" या कथासंग्रहात म्हणतात. "चाकोरीतल्या जीवनाची बंधन ओलांडून कुंपनापलीकडे गेलेल्या माणसांचा त्या कुंपनापलीकडे या माणसांनी आपाआपली मर्यादामुक्त शेतं पेरली, ती बहरली आणि त्या शेतांची भरमसाट पिकं काढण्याचीही चाकोरी ठरून गेली. काही त्या नव्या चाकोरीत दंग झाले. काही त्या चाकोरीनेही अस्वस्थ होऊ लागले. त्यांना कुंपनाच्या आतील आपली जुनी चाकोरीच आता बरी वाटू लागली. पण आता पुन्हा कुंपनाच्या आत जाणं अशक्य होऊन बसलं. कुंपनाच्या आत एक शेतं. कुंपनाच्या पलीकडे फुललेलं हे दुसरं. दोन्हींचं असं काही विलक्षण नातं जडून गेलं, पण दोन्हीमधील मर्यादाच कुंपन मात्र उंचावत गेलं हे कुंपन कृत्रिम आहे का? की तुरूंगाच्या गजाहूनही बलदंड? संवेदनांच्या भुकंपाने ते खिळखिळ होईल का? आतील बाहेरील शेतं एकरूप होतील काय? कदाचित नाहीसुद्धा होणार. पण या भूकंपाचा हादरा जाणवल्याशिवाय राहणार नाही. निदान कुंपनाच्या आतील संवेदनशील मनांना तरी." [१]

प्रस्तुत कथासंग्रहातील कथा लेखक हे रूढ अर्थाने लेखक नाहीत पण त्यांनी आपल्याला आलेला अनुभव शब्दबद्ध केलेले आहे. या अनुभवात तेथील समाजाचे, राजकीय अथवा कलात्मक मूल्यांचे, तेथील प्रश्नांचे समस्यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. त्या अनुभवांचे लेखन करताना जे जसे आहे तसे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यात कुठेही द्वेष, खंत दिसून येत नाही. यातील अनुभव पूर्णपणे वेगळे आहेत. पण लेखकांची त्याकडे बघण्याची दृष्टी तटस्थ आहे. आणि या तटस्थेनेच हेच भारतात घडले तर या गोष्टीचा ते विचार करतानाही दिसतात.

लेखक ज्या समाजात राहतो तेथील संस्कृतीचा त्याच्या लेखनावर परिणाम होतो. हे आपल्याला पूर्वीपासून ज्ञात आहे. म्हणजेच साहित्य आणि संस्कृती या जगाच्या पाठीवरील कोणत्याही मानवी जीवनाच्या अविभाज्य अंग आहेत. प्रस्तुत कथासंग्रहातील दृष्टीने पूर्णपणे वेगळे आहे. वाचताना प्रथम वाचकाला धक्का बसल्याशिवाय राहत नाही. या वेगळेपणामुळे मी हा आगळा वेगळा कथासंग्रह साहित्य आणि संस्कृती या दृष्टिकोणातून अभ्यासण्याचा ठरवला. माझ्या संशोधनाचा अभ्यास विषय म्हणून निवडला आहे.

* प्रकरण – पहिले *

# साहित्य आणि संस्कृती : परस्पर संबंध

* प्रकरण – पहिले *

# साहित्य आणि संस्कृती: परस्पर संबंध

साहित्यनिर्मिती ही एक सांस्कृतिक घटना

साहित्य ही एक थोर कलारूप शक्ती आहे. मानवी जीवनातून ती निर्माण होते. मानवी जीवनाला ती आकाररूप देते. मानवी जीवनाचे विविध आविष्कार आढळतात. या जीवन अनुभूतींचा आविष्कार साहित्यात प्रकट होतो. जीवनानुभूतीशिवाय साहित्य निर्मिती होणे शक्य नाही. वेगवेगळया संघर्षांनी मानवी जीवन भरलेले असते. तात्पर्य, मानवी जीवन हेच कलेचे उगमस्थान आहे. व्यक्ती, समाज व साहित्य हे एकमेकांच्या हातात हात घालून चालत असतात. तरीही कलाकृती ही व्यक्तिगत प्रतिभेचे स्फुरण असते. असे असले तरी व्यक्तीने निर्माण केलेल्या निर्मितीची ऐतिहासिक, सामाजिक, परिस्थितीत जडणघडण होत असते. साहित्यकृतीचा विचार करणे अपरिहार्य ठरते. कारण साहित्यनिर्मिती ही एक सांस्कृतिक घटना आहे. साहित्यनिर्मितीचे आकलन करून घेताना मानवी जीवनच सर्व अंगानी समजावून घेणे आवश्यक असते. साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा या जीवनविषयक प्रेरणा असतात. त्यामुळे साहित्यामध्ये मानवी जीवनविषयक अनुभवांचा म्हणजेच एका अर्थी जीवन मुल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो.

साहित्य आणि संस्कृती यांचे नाते परस्परावलंबित्व स्वरूपाचे आहे. ते जसे परस्परपूरक तसे परस्परपोषक आहे. संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. तद्वत साहित्य संस्कृतीची जोपासना करते. संस्कृती ही कथा, कादंबरी, कविता, नाटक इ. साहित्याच्या माध्यमातून प्रकटते. साहित्याचे प्रमुख प्रयोजनांमध्ये संस्कृती हे एक प्रयोजन येते. आपले चालत आलेले संस्कार, रूढी, परंपरा या पुढच्या पिढीला ज्ञात होण्यासाठी त्या साहित्याद्वारे जतन करून ठेवल्या जातात. यामुळेच जुन्या काळातील कथा, रामायण, महाभारतासारखी महाकाव्ये अजून आपल्या समाजात टिकून आहेत. पूर्वीच्या काळी छपाईची व्यवस्था नव्हती तरीही सर्व गोष्टी, श्लोक हे मुखोद्गत करून ठेवले होते. हे मुखोद्गत साहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसा म्हणून जात असे. अशा प्रकारे आपली संस्कृती साहित्यातून जतन करून ठेवली आहे.

संस्कृतीत कोणत्या गोष्टी येतात. संस्कृती म्हणजे नेमके काय? संस्कृती शब्द आपण अलीकडे नवीन बनविला आहे. Civilization, Culture इ. इंग्रजी शब्दांनी व्यक्त होणारी कल्पना संस्कृती शब्दात आहे. हिंदीमध्ये या इंग्रजी शब्दाचे 'सभ्यता' असे भाषांतर करतात. सुसंस्कृत समाजाच्या जीवनात अंतर्भूत होणाऱ्या सर्व गोष्टींना 'संस्कृती' असे म्हणता येईल. संस्कृती शब्दाचा मुळातच चांगला अर्थ आहे; कारण विचारपूर्वक संस्कार दिले गेलेले आचार विचारच संस्कृतीत अंतर्भूत होऊ शकतात. तथापि उत्तम संस्कृती, हीन संस्कृती असे म्हणण्याचीही पद्धती आहे. हीन संस्कृतीला कै. राजवाडे यांनी 'विकृति' असा शब्द जाणून बुजून योजिला आहे. आपल्या धर्मात आपल्या आचारविचारांचाही समावेश होत असल्यामुळे 'संस्कृती' च्या जागी 'धार्मिक' म्हटले असते तरीही चालले असते. पण संस्कृती शब्द आता रूढ झाल्यामुळे व चांगला अर्थवाहकही असल्यामुळे तोच वापरला जातो. संस्कृती या शब्दातच चांगलेपणा गर्भिले आहे ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे, मनुष्याच्या अंतःकरणावर सुसंस्कार करून त्याची मलिनता व विकारवशता कमी करून, त्यांच्यातील पशुत्व काढून टाकून, त्याला माणुसकी देऊन, हळुहळू देवत्वाकडे नेणारे जे आचारविचार त्यांना संस्कृती म्हणता येईल. एखादा मनुष्य कितपत सुसंस्कृत किंवा सभ्य आहे. हे जसे त्याच्या आचार-विचारावरून समजते त्याप्रमाणे राष्ट्रीय आचार-विचारावरून राष्ट्रीय संस्कृती कळून येते. तात्पर्य, राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय ध्येये व ही साधतील अशा धोरणाने केलेली आचारांची व्यवस्था यांनी राष्ट्रीय संस्कृती बनते.

आपली भारतीय संस्कृती खूप जुनी संस्कृती मानली जाते. जगातल्या ज्या काही मोजक्या जुन्या संस्कृत्या आहेत, त्यात भारतीय संस्कृतीची गणना केली जाते. संस्कृतीत वेद आणि त्यातील देवता यांचा समावेश होतो. ऋगवेद, अथर्ववेद, यजुर्वेद व सामवेद हे चार वेद आणि इतर अनेक पुराणे व उपनिषदे आहेत. ती पूर्वापारपासून मुखोद्‌गत करून जतन केली आहेत. होम, हवन, देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी करण्यात येणारे विधी ह्या सर्वांचा समावेश आहे.

संस्कृतीत समाजाचा व समाजव्यवस्थेचाही अंतर्भाव असतो. पूर्वापारपासून अगदी वेदकाळापासून भारतीय समाज काही नियमांचे पालन करीत आला आहे. कुटुंबपद्धती, विवाहसंस्था, आश्रमसंस्था, वर्णव्यवस्था अशा नियमांवर आधारित भारतीय समाज होता. आज

बदलल्या काळानुसार या नियमात बदल झालेले आहेत. पण यातले बरेच नियम अजुनही पाळले जातात. उदा. कुटुंबसंस्था, विवाह या गोष्टी अजून समाजात आहेत.

कुटुंबपद्धतीमध्ये काळानुसार फरक पडत गेला. म्हणजे मातृसत्ताक, पितृसत्ताक कुटुंब, एकत्र कुटुंब, विभक्त कुटुंब, असे बदल घडत गेले. विवाहमध्येही वेदकाळात प्रौढविवाहच होते नंतर मात्र धर्माचा वेगळाच अर्थ लावून बालविवाह पद्धत अस्तित्वात आली. ह्या पद्धतीचा समाजसुधारकांनी निषेध केला. बऱ्याच प्रतिकारानंतर सध्या पुन्हा प्रौढविवाह चालू झाले. त्याचप्रमाणे आता विधवाविवाहही होतात. समाजाने या गोष्टी आता स्वीकारल्या आहेत.

वेदकाळापासून मनुष्याच्या जीवनाला चार आश्रमात विभागले आहे. ब्रम्हचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम, या चार आश्रमात मानवाने आपले जीवन व्यतीत करावे असे आपल्या पुराणात नमूद केले आहे. यात पहिल्या आश्रमात गुरूगृही राहून शिक्षण घ्यावे, दुसऱ्या आश्रमात विवाह करून मुले-बाळे पहावी, तिसऱ्या आश्रमात समाजासाठी समाजोपयोगी कार्य करावे, तर चौथ्या आश्रमात सर्व संसार त्याग करून ईश्वर चिंतनात वेळ घालवावा असे म्हटले आहे. याप्रमाणे अगदी शिस्तबद्ध पद्धतीने आपले जीवन व्यतीत करावे असे सांगितले आहे. पण आधुनिकतेबरोबर ही आश्रमव्यवस्था लोप पावली. प्रत्येकजण आपल्याला जसे सोयीचे होईल तसे जगू लागला.

व्यवसायाच्या दृष्टीनेही वेदकाळापासून नियम घालून दिले आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व क्षूद्र हे चार वर्ण सांगितले आहेत. यात प्रत्येकाने वर्णानुसार काम करावे. पण पूर्वी वेदकाळात वर्ण हे जन्मानुसार ठरत होते. त्यामुळे कोणीही व्यक्ती कोणतेही काम करू शकत होती. पण नंतर वर्णव्यवस्था खूपच संकुचित झाली. त्यामुळे प्रत्येकाला ज्याच्या पोटी जन्माला आलो त्याचेच काम करणे भाग पडले. त्यामुळे समाजात एक प्रकारचा बंदिस्तपणा आला. या बंदिस्तपणाविरूद्ध लोकांनी बंड केले. त्यामुळेच आज प्रत्येकजण आपल्या इच्छेनुसार व कुवतीनुसार व्यवसाय करू शकतो.

भारतीय संस्कृतीत वेगवेगळया संस्कारांचेही खूप महत्त्व आहे. संस्कारामुळे मनुष्य संस्कारित बनतो. पूर्ण समाज संस्कारित होता असा विश्वास होता. त्यामुळेच भारतीय संस्कृतीत

सोळा संस्कारांना खूप महत्त्व आहे. गर्भाधान, पुंसवन, (पुत्र व्हावा म्हणून) अनवलोभन, (गर्भ रक्षण) जातकरण, नामकरण, अन्नप्राशन, उपनयन, स्नातक इ.संस्कार केले जात होते.

समाजात राहताना प्रत्येकाने कसे वागावे याचेही नियम होते. मोठयांशी बोलताना आदराने बोलावे, मोठयांना उलट उत्तरे देवू नये, नेहमी खरे बोलावे, आपल्याला सोपवलेले काम योग्य रितीने पूर्ण करावे, विनाकारण संताप, क्लेश करू नये, प्रत्येक नात्याचा मान राखूनच आचरण करावे या गोष्टी प्रत्येकाने पाळल्या पाहिजेत असा दंडकच असे. ह्या गोष्टी पाळण्यासाठी कुटुंबातच लहानपणापासून सवय लावली जात असे. काळ बदलला असला तरी आजही आपल्या समाजात या गोष्टी थोडया कमी-अधिक प्रमाणात दिसून येतात.

संस्कृतीत अशा अनेक सामाजिक आणि वैयक्तीक गोष्टींचा समावेश होतो. माणूस जन्माला आल्यापासून मरेपर्यंत तो समाजाशी बांधलेला असतो. समाजातूनच संस्कृती होत असते त्यामुळेच व्यक्तींचीच संस्कृती असते असे म्हणावे लागते. आणि ही सर्व जुनी संस्कृती साहित्यातून जतन करून टेवली जाते.)

ललित वाङ्मय मानवी मनावर आपला ठसा उमटवित असते. समाज मनाला गती देत असते. अस्सल कलाकृतीतून त्या काळाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा नकळत सूचित होतात. तात्पर्य, मानवी जीवन हा साहित्याचा मुख्य विषय आहे. माणसाच्या मनातील भलेबुरे विचार आणि विकार, जीवनाची त्याला येणारी प्रचिती, प्रसंगी त्याला जाणवणारी असहायता या सर्व गोष्टी साहित्यात येतात. "जिच्या कुशीत मानवी जीवन अंकुरते, जिच्या नित्य संपर्कातून फूलते आणि शेवटी जिच्यात ते विलीन होते त्या सृष्टीचे सत्य स्वरूप जाणून घेण्याची व ते प्रकट करण्याची क्षमता साहित्यात आढळते." [१]

## कलावंत व समाज

लेखकाच्या व्यक्तीत्वाचे रंगरूप घेऊनच कलात्मक साहित्याची जडण-घडण होत असते. व्यक्ती ही कितीही स्वतंत्र असली तरीही तिचा समाजाशी अतूट असा संबंध असतो. समाज-निरपेक्ष अशी व्यक्ती कधीच नसते. कितीही मोठा प्रतिभावंत, प्रज्ञावंत मनुष्य असला तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण आणि आविष्कार हा समाजिक जीवनातूनच होत असतो. लेखकाचे

व्यक्तिमत्त्व हे त्याच्या वाङ्मयाचे मूळ असते. परंतु हे व्यक्तित्व स्वयंभू आणि स्वतंत्र असत नाही. सभोवतालच्या परिस्थितीचे संस्कार त्याच्यावर होत असतात. लेखकाचे व्यक्तित्व, त्याच्या सभोवतालचे वातावरण आणि मानवी जीवन यांच्या त्रिवेणी संगमातूनच साहित्य निर्माण होत असते. कलावंताच्या व्यक्तित्वावरच कुटुंबाचे, घराण्याचे, परंपराचे जसे दृढ संस्कार झालेले असतात. तसे सभोवतालच्या समाजातील जीवनविषयक जाणिवांचे, समाजाच्या परंपराचे, तत्वप्रणालीचे त्याच्यावर परिणाम झालेले असतात. तत्कालीन सांस्कृतिक परिस्थितीचे पडसादही त्याच्या मनावर उमटत असतात. एक विशिष्ट सामाजिक जीवनानुभव ही त्याच्या साहित्य निर्मितीचे बीजभूत शक्ती असते. कलावंत व व्यक्ती या नात्याने तो समाजाचा एक घटक असतो. आणि त्यामुळेच त्याच्या व्यक्तित्त्वात अनेक सामाजिक संदर्भ रूजलेले असतात. हे सर्व संदर्भ त्याच्या साहित्यकृतीतून डोकावतात. व्यक्ती, समाज व मानवी जीवन यांचे संबंध इतके एकरूप झालेले असतात की त्याचे सरमिसळ प्रतिबिंब साहित्यामध्ये प्रकट होते. साहित्यात उमटते. कलावंताच्या कलाकृतीतून किंवा साहित्यातून त्याने घेतलेल्या समाजजीवनाचा आविष्कार कधी जाणतेपणाने घडत असतो.

लेखकाच्या व्यक्तिगत संस्काराबरोबरच त्याच्या काळातील सामाजिक समस्याही त्याच्या साहित्यात उमटत असतात.

उदा. हरिभाऊ आपटे यांच्या साहित्यात त्यांच्या व्यक्तिगत संस्काराबरोबरच त्यांच्यावरील सामाजिक संस्काराचे पडसाद उमटलेले आहेत.

उदा. त्यांच्या "मी" या कादंबरीत स्त्रियांची परवशता, तर "पण लक्षात कोण घेतो" यात स्त्रियांच्यावर होणारे अन्याय आले आहेत. देवलांच्या "शारदा" मध्ये बालजरठ विवाहाचे प्रतिबिंब उमटले आहे. या संदर्भात कोल्हटकरांचे "गुप्तमंजुष" खाडिलकरांचे "कीचकवध" प्र. के. अत्रे यांचे "उदयाचा संसार" रांगणेकरांचे "कुलवधू" उल्लेखनीय आहेत.

एका वयोवृद्ध संस्थानिकाने "शारदा" नावाच्या बालिकेबरोबर विवाह केल्याची बातमी ही "शारदा" या नाटकाच्या लेखनामागची प्रेरणा ठरली. या नाटकाच्या लेखनामागे देवलांच्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचे पडसाद आढळतात. हे नाटक लिहिले गेले तेव्हा जरठकुमारी विवाहाला कायदेशीर प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच शारदेच्या जन्मापूर्वी ५० वर्षे

अगोदर थोर समाजसुधारक मंडळींनी स्त्री शिक्षण, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवाविवाह इत्यादी प्रश्नांविषयी समाजजागृतीचे प्रयत्न केलेले होते व "शारदा" नाटक रंगभूमीवर येण्याच्या ८ वर्षे अगोदरच संमतीवयाचे बील पास झालेले होते. तात्पर्य, लोकजागृतीसाठी नाटकासारख्या वाङ्मय प्रकाराचा वापर करण्यात येऊ लागलेला होता. "साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा, त्या देशाचा इतिहास, भूगोल, संस्कृतीचा लेखकाच्या काळातील युगधर्माचा एकूण परिणाम त्याच्या साहित्यकृतीवर होत असतो हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते." [२] कलावंत सभोवतालच्या घटना, घडामोडींपासून, चळवळींपासून अलिप्त राहू शकत नाही. कलावंताचे संवेदनशील मन सभोवतालच्या घटनांतील स्पंदने टिपत असते. सांगण्याचा उद्देश हा की साहित्याची निर्मिती मानवी जीवनातून होत असते. त्यामुळे समाजजीवनाचे प्रतिबिंब समाजजीवनाची स्पंदने साहित्यात उमटणे अटळ असते.

साहित्याची समाजसापेक्षता

लेखकाची व्यक्तिनिष्ठता व समाजनिष्ठता ललित वाङ्मयात उमटणे अपरिहार्य असते. कारण लेखकाच्या व्यक्तित्वाची घडण ही समाज सापेक्ष असते.

साहित्य व साहित्यिक यांचे समाजाशी असणारे नाते परस्पर प्रेमाचे असते. साहित्यिकाची साहित्यकृती ज्या भाषेत प्रकट होते ती भाषाही समाजाचीच असते. भाषेतून व्यक्त होणारे अनुभव देखील सामाजिकच असतात. समाजात अनुभवलेल्या कृती–उक्तींना ललित वाङ्मयाच्या समर्थ सजावटीची जोड साहित्यिक देत असतो. समाजातील सर्वसामान्यापर्यंत साहित्य पोहचते. सामान्यांची वाचनाची गोडी वाढते. साहित्य वाचनाने वाचकाला जीवनाच्या विविध रूपांचे दर्शन घडते आणि त्यामुळे साहित्याबद्दलची जवळीक त्याच्या मनामध्ये निर्माण होते.

समाजातील आंदोलने, सुखदुःखे, समस्या, संकटे, तत्कालीन युगधर्म इत्यादींचा आविष्कार साहित्यातून प्रकट होतो. अर्थात साहित्य म्हणजे भाषेच्या रूपाने घडलेला समाजाचा, जीवनाचा आविष्कार असतो या संदर्भात " Literature is an Expression of society and Speech is the Expression of man"[३] हे डीबोनाल्ड यांचे उद्गार अर्थपूर्ण असतात.

माणसाच्या जन्मापासून त्याच्या सामाजिक जीवनाला सुरुवात होते. सामाजिक जीवन हा माणसाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असतो. चार्ल्स, फुले म्हणतात त्याप्रमाणे माणूस आणि समाज ही एकाच कल्पनेची रूपे आहेत. एक वैयक्तिक आहे तर दुसरं सामूहिक आहे. साहित्य, साहित्यिक आणि समाज यांचा अनोन्य संबंध लक्षात घेऊन स. शि. भावे म्हणतात "साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमाने केलेली साहित्यनिर्मिती, साहित्यिक म्हणजे कलानिर्मितीची क्षमता असलेली व कलानिर्मिती करणारी व्यक्ती आणि समाज म्हणजे पारंपारिक व नव्याने निर्माण होणाऱ्या, हितसंबंधाच्या संदर्भात एकत्र आलेला व एकत्र राहणारा मानव समूह." [४] या विधानावरून साहित्य, साहित्यिक आणि समाज यांचे अनोन्य संबंध लक्षात येतात.

जीवनाकडून पुन्हा जीवनाकडे असा साहित्याचा प्रवाह सतत वाहत असतो. अर्नेस्ट रेमंड म्हणतात, त्याप्रमाणे "Literature is an escape from life in to life Literature is a rainbow which hanging pendent across the screen of life." [५]

प्राचीन विचारवंतांनी लिहिलेल्या वाङ्मयावरूनही साहित्य आणि समाज जीवन यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट होतो.

उदा. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी "ज्ञानेश्वरी" हा ग्रंथ लिहिला. प्राचीन काळी सर्व सामान्य समाज ज्ञानापासून वंचित होता. लेखन क्षेत्रात संस्कृत भाषेचे वर्चस्व होते व संस्कृत भाषा जनसामान्यांना समजत नव्हती. संस्कृतमधील ज्ञानभंडार जनसामान्यांसाठी देशी भाषेत स्पष्ट करणे ही काळाची गरज होती. ज्ञानेश्वरांनी ही गरज ओळखून त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या उत्कट सामाजिक जाणिवेमुळे त्यांनी "ज्ञानेश्वरी" देशी भाषेत लिहली व उच्च विचार जनसामांन्यापर्यंत पोहचविले. ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी असणाऱ्या समाजाभिमुख वृत्तीमुळे त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या सहृदय अंतःकरणामुळे "ज्ञानेश्वरी" सारख्या काव्य ग्रंथाचे लेखन झाले. याच सामाजिक जाणिवेने महानुभव पंथीयांनीही कटाक्षाने मराठीतूनच ग्रंथ रचना करण्याचा आग्रह धरला ही गोष्ट त्या काळातील लेखकांची समाजभिमुखता आणि समाजसापेक्षता स्पष्ट करते. या संदर्भाला संत एकनाथांनी भारूडाचे उदाहरणही त्यांच्या ठिकाणी असलेली समाजभिमुखता व समाजसापेक्षताच स्पष्ट करते.

"बुडती हे जन, ना देखवे डोळा"

किंवा

"आम्ही वैकुंठवासी/आलो याची कारणाशी"

या संत तुकारामांच्या अभंगावरून लेखकाच्या आणि वाङ्मयाच्या समाज सन्मुखतेची च समाजसापेक्षतेची साक्ष पटते.

इ. स. च्या अटराव्या शतकाअखेर पर्यंत मराटी साहित्य अध्यात्मप्रवण होते. कारण तत्कालीन समाज निवृत्तीपर वृत्तीचा होता. धर्म आणि मोक्ष मानणारा समाज असल्यामुळे तत्कालीन मराटी वाङ्मय अध्यात्मिक स्वरूपाचेच निर्माण झाले. पुढे ब्रिटीश राजवट आल्यानंतर महाराष्ट्रीय समाजाच्या जीवनदृष्टीत कमालीचा बदल झाला व अध्यात्मापेक्षा लौकिकतेलाच प्राधान्य मिळाले व साहित्य हे अधिकाधिक प्रवृत्तिपर होत गेले "शाहिरीवाङ्मय," 'बखर वाङ्मय' इत्यादी उदाहरणे देता येतील.

पुढील काळात औद्योगिक संस्कृती उदयाला आली. यंत्रयुगाचे झालेले परिणाम साहित्यातून प्रकट होऊ लागले. या काळात मार्क्सवादी विचारप्रणालीचा परिणाम साहित्यावर झाला. मानवी जीवन व्यवहाराचा पाया माणसामाणसातील आर्थिक संबंध हा असून त्या अनुषंगाने साहित्य कला व संस्कृती इत्यादींचा मनोरा उभा असतो असे मार्क्सने सांगितलेले आहे. या विचारातूनच साहित्याची समाजसापेक्षता स्पष्ट होते. कार्ल मार्क्स, फ्रेडरीक, एंजल्स या तत्ववेत्यांनी ही साहित्यनिर्मितीचा संबंध समाजजीवनाशी असतो असे विश्वासपूर्वक सांगितले आहे. साहित्यनिर्मिती समाजसापेक्षच असल्याचे प्रतिपादन लेनिन, टॉलस्टॉय यासारख्या विचारवंतानीही केलेले आहे. तात्पर्य, कोणतीही श्रेष्ठ साहित्यकृतीची निर्मिती जीवन प्रत्ययातूनच झालेली असते.

<u>साहित्यातील भावनात्मक</u>

प्रत्येक कलावंत स्वतःला प्रतीत झालेल्या अनुभवांचा आविष्कार साहित्यातून प्रकट करीत असतो. त्याला आलेल्या अनुभूतींचा तो त्याच्या दृष्टीने एक वेगळा अर्थ लावीत असतो. तोच त्याचा एक आत्माविष्कार असतो. त्याचे जीवनभाष्य असते. तीच त्याची संस्कृती असते

त्यालाच आपण साहित्य-संस्कृती म्हणतो. कलावंताच्या अनुभूतीला जशी व्यक्तिगत भावनात्मकता प्रकट होते तशी समाजनिष्ट भावनात्मकताही प्राप्त होत असते. कलाकृतीमधील तत्कालीन भाग, काळाचे संदर्भ हळूहळू निस्तेज होतात व त्यातील भावनात्मकतेमुळेच माणसांची मने बदलतात. साहित्य हे माणसांची मने बदलण्याचे काम करते.

उदा. "पण लक्षात कोण घेतो", "शारदा" यासारख्या कलाकृतीतून स्त्रियांच्या समस्या मांडल्या गेल्या. एकेकाळी केशवपन, स्त्री शिक्षण, जरटकुमारी विवाह यासारख्या समस्या होत्या. इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस' चे उदाहरणही उल्लेखनीय आहे. या 'डॉल्स हाऊस' नाटकातील 'नोरा' ही नायिका घराबाहेर पडताना तिने ओढलेल्या दरवाजाने सर्व जगाला हादरा दिला होता. आजच्या काळात या समस्या निस्तेज झाल्या असल्या तरी त्यांचा भावनिक परिणाम अजूनही पूर्वी इतकाच तीव्र आहे.

## सामाजिक चळवळ आणि वाङ्मयनिर्मिती

समाजाचा एक घटक म्हणून लेखक समाजात वावरत असतो. अर्थात त्यामुळे समाजातील धार्मिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन चळवळीपासून तो अलिप्त राहू शकत नाही. या सर्व चळवळींचा त्याचा संबंध जवळचा असू शकतो व त्या चळवळीशी त्याची बांधिलकी तयार होत राहते. अशा चळवळी लेखकाच्या वाङ्मय निर्मितीला प्रेरणाच ठरतात.

उदा. रामदासांनी वर्णन केलेली 'अस्मानी', 'सुलतानी' त्यांनी सांगितलेले प्रपंचविज्ञान, स्वराज्य स्थापनेच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेले विचार या त्यांच्या काव्यलेखनाची बीजे तत्कालीन राजकीय चळवळीत सापडतात.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा जोतिराव फुले यांचे नेतृत्व उदयाला आले व त्यांनी चातुर्वर्ण्यावर जोरदार हल्ला चढविला. जातीभेदाविरूद्ध आंदोलन करून सत्यशोधक चळवळ उभारली, उदंड अशा प्रकारचे साहित्यलेखनही केले. त्यांनी 'गुलामगिरी', 'ब्राम्हणांचे कसब', 'शेतकऱ्यांचे आसूड' वगैरे वाङ्मयनिर्मिती केली आणि म. फुले त्यांच्याच प्रेरणेने पुढे अनेक कार्यकर्ते, वक्ते, लेखक मंडळी निर्माण झाली. राष्ट्रीय चळवळीने भारतीय जीवन ढवळून निघाले व देशाभिमान व्यक्त करणारे विविध प्रकारचे साहित्य लिहिले गेले. स्त्रीविषयक प्रश्नांना

प्राधान्य देणाऱ्या चळवळी सुरू झाल्या. लोकहीतवादी, न्या. रानडे, आगरकर इत्यादींचे वैचारिक लेख प्रकाशित होऊ लागले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रीशिक्षण प्रसाराची चळवळ उभारली. विष्णुशास्त्री पंडितांनी विधवा विवाहाची चळवळ उभारली याचा परिणाम असा झाला की अनेक सामाजिक कथा, कादंबऱ्या, नाटके, प्रवचने आणि विविध प्रकारची मासिके, साप्ताहिके लिहली जाऊन प्रकाशित झाली.

या काळामध्ये शेतकरी, कामगार, दलित या विविध चळवळी उदयाला आल्या आणि या चळवळींमुळे वाङ्मय निर्मितीला प्रेरणा मिळाली. तात्पर्य, वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा सामाजिक चळवळीत कशा दडलेल्या असतात हे येथे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे वाङ्मयनिर्मिती ही सुद्धा सामाजिक चळवळींना गती देते. लोकमानसाला आकार देते, हे येथे यानिमित्ताने स्पष्ट होते. अशा सामाजिक चळवळीतून जी साहित्यकृती निर्माण झाली त्यामधून तत्कालीन समाजजीवन विविध रूपाने प्रकट झालेले आढळते. महाराष्ट्रीय समाजाचे गेल्या शंभर वर्षाचे सामाजिक संदर्भ पाहावयाचे असल्यास तत्कालीन कादंबरीकडे पहावे लागते. वि. पा. दांडेकर यांनी या संदर्भात "आमच्या सामाजिक नाटकाकडे बघावे"[६] असे सांगितले आहे.

## साहित्याचे सामर्थ्य

साहित्य ही भावना जागृत करणारी एक महान शक्ती आहे. या शक्तीच्या बळावर साहित्य हे वाचकाच्या मनावर संस्कार करीत असते व वाचकाला अंतर्मुख करीत असते. जीवन आणि कला यांच्या समन्वयातून मानवी मन संपन्न होते. समृद्ध व उन्नत होते. तात्पर्य— समाजावर साहित्याचा जबरदस्त परिणाम होत असतो. सामान्य माणसे साहित्यातून होणाऱ्या संस्काराचे आदर्श निवडतात तसेच जीवननिष्ठा सांभाळतात. वि. स. खांडेकर [७] यांनी साहित्याचे सामर्थ्य विशद करताना म्हटले आहे की, "आजचा ललित लेखक हा भूतकाळाचा इतिहासकार नव्हे किंवा वर्तमानकाळाचा चित्रकार नाही. रशियातील क्रांती टॉलस्टॉयने शंभर वर्षे अलिकडे आणली."

साहित्य वाचनाचा परिणाम वाचकाच्या व्यक्तिमत्त्वावर विविध प्रकारने होत असतो. हे ही साहित्याचे एक सामर्थ्य आहे. कोणत्याही देशातील वाङ्मयाचा इतिहास पाहिला तर त्या त्या देशातील संस्कृतीची जडण-घडण करण्यामध्ये साहित्याचा फार मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

साहित्याचा समाजमनावरही परिणाम होत असतो. तो परिणाम हळूहळू होत असतो हे ही साहित्याचे मोठेपणा होय. कोणत्याही कलेचे मोठेपण केवळ तिच्या सौंदर्यात नसून तिच्यामुळे होणाऱ्या परिणामात असते. साहित्य हे मानवी जीवनाला आनंद देत असते. दुःख संकटे अनुभवताना धीर देत असते असे वि. स. खांडेकरांनीही सांगितले आहे.[८] साहित्याच्या संदर्भात कलेसाठी कला, जीवनासाठी कला असे वाद गाजलेले आहेत. हे सर्वांना ज्ञात आहेच. साहित्य हे मानवी भावनांवर खोल परिणाम करते.

उदा. "रामायण", महाभारत" या महाकाव्यांनी भारतीय समाजाला चिरंतन जीवनमूल्ये दाखवून दिलेली आहेत. या महाकाव्यांनी भारतीय समाजाला आकार देण्याचे संस्कार करण्याचे सांस्कृतिक कार्य केले आहे. हे भारतीय समाजशास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी मान्य केले आहे.

उदा. "यमुनापर्यटन", "पण लक्षात कोण घेतो", "मुक्तमाला", "मंजुघोषा", "सुशिला", "सगिर्णी" इत्यादी सामाजिक कादंबऱ्या तसेच "शारदा", कीचकवध", "सुदाम्याचे पोहे", "उदयाचा संसार" इत्यादी सामाजिक नाटके कधी कधी या कलाकृती मानवी मनावर परिणाम करतात. तर कधी समाजमन हेलावून सोडतात. तर कधी योग्य दिशेने विचार करण्याची प्रेरणा देतात. तात्पर्य—मानवी मनातच परिवर्तन घडण्याचे सामर्थ्य साहित्यात असते. ब्रिटीश राजवटीत "केसरी" व "काळ" या वृत्तपत्रांनी राजकीय परिवर्तने घडवून आणली.

तर राजकीय विषयावरील नाटकांनाही ही परिवर्तने अधिक यशस्वीपणे घडवून आणलेली आहेत. अशाप्रकारे साहित्यकृतींनी समाजमनावर कसा इष्ट परिणाम घडवून आणलेला आहे. याची उदाहरणे देशोदेशीच्या वाङ्मय इतिहासात असंख्य प्रमाणात आढळतात.

उदा. "क्राईम अँन्ड पनिशमेंट" आणि "अँना कॅरीनिना", "वॉर अँन्ड पिस" (टॉलस्टॉय) यासारख्या कलाकृतींनी समाज परिवर्तन केल्याचे सर्वांना माहीत आहे.

तत्कालीन समाजाची मानसिकता कशी होती हे साहित्य सांगते. त्यातून काय घडले त्याचा आरसा समोर टेवते. म्हणजेच चांगले काय आणि वाईट काय याचे ज्ञान होते. काय असावे आणि काय असू नये हे ही साहित्य सांगते.

ज्ञानेश्वर काळातील पूर्ण समाजाचे चित्र त्यावेळच्या साहित्यात उमटले आहे. संतसाहित्यात समाजातील पराकोटीचा भेदाभेद आपल्याला दिसतो. अस्पृश्यांना जनावरांपेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली जात होती. त्यांना अन्न, पाणी सुद्धा दिले जात नव्हते. याची जाणीव आपल्याला साहित्यातूनच होते. पण याच संतांनी आपल्या अभंगातून उपदेश करताना उच्च नीच कोणी नाही सर्वजण सारखेच आहेत. सर्व माणसे प्रभूची लेकरे आहेत. सर्वांना समान वागवावे. तसेच जगण्याचा सगळयांनाच हक्क आहे. अशी शिकवण दिली या सर्व गोष्टी आपल्याला संतवाङ्मयातून समजतात.

राजा राममोहन रॉय यांनी आपल्या भाषणातून, लेखातून सतीच्या चाली विरूद्ध बंड केले. सतीची चाल ही एक अमानुष रूढी आहे. नवरा वारला तर त्यात स्त्रीचा काय दोष, ती विधवा झाली तर त्यात तीचा काय दोष उलट ती एक माणूस आहे. तिलाही जगण्याचा हक्क आहे. तिला जबरदस्तीने मारण्यात काय अर्थ आहे. त्यांनी व त्या काळच्या अनेक सुधारकांनी ही चाल बंद करावी, कायदा व्हावा यासाठी खूप प्रयत्न केले. या प्रयत्नांचे फळ म्हणून इंग्रजांनी 'सतीचा कायदा' पास केला. म्हणजेच साहित्यातून आपल्याला चांगल्या वाईटाचे ज्ञान होते.

'एकच प्याला' हे नाटक तर सदासर्वकाळ समाजासाठी एक आदर्शच टरेल. यात गडकऱ्यांनी एका सोज्वळ कुटुंबाची दारूमुळे कशी वाताहत होते हे अगदी उचितपणे दाखवले आहे. सिंधू आणि तिचा संसार यांचे चित्र रेखाटताना समस्त समाजातील दारू पिणाऱ्या पुरुषांच्या बायकांचे चित्र रेखाटले आहे. घरातील कर्ता पुरूष जर व्यसनाधीन झाला तर त्या स्त्रिची आणि घराची धुळधाण कशी होते हे दाखवले आहे. दारूची नशा ही पूर्ण घर व माणसे उध्वस्त करते हेच दाखवून गडकऱ्यांनी जणू समाजाच्या डोळयात अंजन घातले आहे. म्हणजेच साहित्य काय असावे आणि काय असू नये हे ही सांगते.

साहित्य आणि संस्कृती यांचे एकमेकांचे पडसाद एकमेकांवर उमटत असतात. हे 'कुंपनापलीकडले शेत' या कथासंग्रहात दिसून येते. यात महाराष्ट्रीय माणसे परदेशात

व्यवसायानिमित्ताने स्थायिक झालेले आहेत अशा माणसांना तिथे राहताना त्या समाजातील जे अनुभव आले त्याचे कथारूपाने लेखन केले आहे.

यातील प्रत्येक कथेत लेखक हा मूळ भारतीय असल्यामुळे त्याच्या त्या प्रसंगाकडे व घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन भारतीय संस्कृतीनुसार आहे. त्यामुळे त्या लेखकाला वेगळेपणा निश्चितपणे जाणवतोय. हा वेगळेपणा जाणवलाय म्हणूनच त्यांनी घटना व प्रसंग एकत्र केले. जेणेकरून इतरांनाही त्या समाजाचे ज्ञान व्हावे. या कथा एकत्रित केल्या आहेत.

यातील प्रत्येक कथेत भारतीय समाज व पाश्चिमात्य समाज यांचा प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती भिन्न आहे हे दिसून येते. तेथील संस्कृती त्यांचे रिवाज, चालीरीती किती वेगळया आहेत हे आपल्याला दिसून येते.

कुमारीमाता, नाईट क्लबमध्ये नृत्य करणाऱ्या नृत्यांगना व त्यांचे आयुष्य, वयस्क माणसे व त्यांचे आयुष्य यासारख्या गोष्टी आणि त्याकडे पाहण्याचा त्या समाजाचा दृष्टिकोन आणि त्यांची संस्कृती या गोष्टींचे ज्ञान आपल्याला या कथासंग्रहातून होते. आतापर्यंत पाश्चिमात्य समाजातील या गोष्टीचे ज्ञान होते. याकडे जाणीवपूर्वक कोणी लक्षच दिले नव्हते. दिलीप चित्र्यांनी संपादित केलेल्या या कथासंग्रहात हे वेगळेपण निश्चित जाणवते. या संग्रहात समाज व साहित्य, संस्कृती या गोष्टी परस्परांवर आधारित आहेत हे स्पष्ट दिसते.

# संदर्भ सूची

१. प्रा. सरदार गं. बा., "अध्यक्षीय भाषण", – मुंबई व उपनगर आणि मराठी साहित्य संमेलन अधिवेशन एकविसावे दि. २५ ऑक्टोबर १९७५

२. श्री कुलकर्णी गो. म., "मराठी साहित्यातील स्पंदने", पुणे प्रकाशन १९८५ पृष्ट क: ५

३. Henry Levin, Literature is an Institution Sociology of 'Literature and Drama', Page No. 56

४. भणगे भालचंद्र शंकर- संपादक, "साहित्यविचार आणि समाजचिंतन, षष्टब्दीपूर्ती गौरवग्रंथ," ओरिएंट लॉगमन्स लिमिटेड, मुंबई, कलकत्ता, चेन्नई, नवी दिल्ली, पुणे, २ ऑक्टोबर १९६७ पृष्ट क. १२८

५. Earnest Raymond, 'Through Literature to Life', Page No. 102

६. श्री दांडेकर वि. पां., "मराठी नाटयसृष्टी सामाजिक नाटके", बडोदे – १८७२ द्वितीयावृत्ती पृष्ट क. १३, १४

७. श्री दांडेकर वि. पां., "अभिषेक", पुणे प्रकाशन, १९७३ पृष्ट क. १५४

८. तत्रैव पृष्ट क. ३३४ (प्रस्तावना)